| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर<br>इमेल cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>मो.क्र.९८१९९२०८२७९ | स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५० |

प्रेसनोट दिनांक.०५.११.२०२४

## गुन्हे शाखा घटक –४ उल्हासनगर कडून अवैधरित्या अग्नीशस्त्र बाळगणाऱ्या इसमास अटक.

गुन्हे शाखा, घटक–४, उल्हासनगर नेमणुकीतील पोहवा/३२१६ गणेश गावडे यांना, ''हॉटेल साई पॅलेस रेस्टॉ ॲन्ड बार, नेवाळी नाका, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे भगवती यादव नावाचा इसम जेवण करण्याकरीता बसलेला असुन त्याचे ताब्यात देशी बनावटीचे अग्नीशस्त्र आहे'' अशी गुप्त बातमी प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने दिनांक ०४/११/२०२४ रोजी २०:०५ वा. चे सुमारास गुन्हे शाखा घटक–४ चे पोलीस पथकाकडुन करण्यात आलेल्या कारवाईत, इसम भगवती सबाजीत यादव, वय २४ वर्षे, राह. निर्मला देवी चिंतामण दिघे आश्रम शाळेच्या बाजुला, कात्रप पाडा, बदलापूर पुर्व, जि.ठाणे यास ताब्यात घेण्यात आले. त्याचे कमरेस पॅन्टचे आत लपविले एक देशी बनावटीचे अग्नीशस्त्र (पिस्टल) व पॅन्टचे खिशात दोन जिवंत राउंड असे एकुण ३१०००/– रूपये किमतीचा मुद्देमाल मिळुन आला आहे. त्याचे विरूध्द हिल लाईन पोलीस ठाणे गु.रजि.नं. ७८५/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ सह म.पो.का कलम ३७(१),१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा घटक–४, उल्हासनगर नेमणुकीतील श्रेणी पोउपनि/शाम रसाळ हे करत आहेत. त्याचे ताब्यात मिळुन आलेले अग्नीशस्त्र त्याने कोठुन व कोणाकडुन आणले याबाबत अधिक तपास चालु आहे.

नमुद अटक आरोपीत हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन यापुर्वी देखील अशाच प्रकारे अवैध अग्नीशस्त्र जवळ बाळगल्या प्रकरणी बदलापुर पुर्व पो.स्टे.१७५/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५, भादवि २०१, म.पो.का. कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई श्री.शिवराज पाटील, पोलीस उप आयुक्त, गुन्हे ठाणे शहर, श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध–१, गुन्हे शाखा ठाणे शहर, तसेच श्री.अशोक कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, घटक–४, उल्हासनगर यांचे मार्गदर्शनाखाली श्रेणी पोउपनि/श्री.शाम रसाळ, पोहवा/गणेश गावडे, पो.हवा/चंद्रकांत सावंत, पोहवा/योगेश वाघ, पो.हवा/मंगेश जाधव, पो.ना/विक्रम जाधव, पो.कॉ/राजेंद्र थोरवे, पोकॉ/संजय शेरमाळे यांनी केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर